सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय

'वनभवन' उस्मानपुरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००५

दुरध्वनी : (०२४०) २३४५५०८ ई-मेल : ccftabad@mahaforest.gov.in

---

ईमेलद्वारे

**जा.क्र.कक्ष-२(१)/न्या.प्र.क्र.१४/P-II(२०२१-२२)/ १२१५ /सन २५-२६**
**छत्रपती संभाजीनगर: ४३१ ००५, दिनांक ०६ /०२/२०२६**

**प्रति,**

**सहाय्यक संचालक, (जाहिरात)**
**माहिती व जनसंपर्क महासंचनालय,**
**महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**विषय:-** वनवृत्तासाठी कंत्राटी पध्दतीवर विधी सल्लागार म्हणुन नियुक्ती बाबत.

**संदर्भ:-** **१.** या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२(१)/न्या.प्र.क्र.१४/ P-II (२०२१-२२) /९७८/२५-२६दि.०८/१२/२०२५.
**२.** या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२(१)/न्या.प्र.क्र.१४/ P-II (२०२१-२२) /१०४७/२५-२६/ दिनांक १९ / १२/२०२५.

विषयांकीत प्रकरणी छत्रपती संभाजीनगर वनवृत्तासाठी विधी सल्लागार हे पद कंत्राटी पध्दतीने भरावण्यासाठी असल्याने या कार्यालयाचे संदर्भ क्र.१ अन्वये वर्तमान पत्रात प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा व अर्जाचा नमुना पाठविण्यात आलेला होता. तथापी संदर्भ क्र.२, अन्वये महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, इत्यादी संस्थांचे निवडणूक प्रक्रियाची आचार संहिता लागु असल्यामुळे पुढील तारीख वेगळयाने कळविणेबाबत विनंती करण्यात आली होती.

तरी सदरची जाहीरात दिनांक १७/०६/२०२६ रोजी कोणत्याही एका मराठी दैनिकात, जे दैनिक मराठवाडयातील सर्व जिल्हयामध्ये प्रसिध्द होते, त्या दैनिकात किमान जागेत प्रसिध्दी देण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र:- वरील प्रमाणे.

(प्रमोद चंद लाकरा)
(विभाग प्रमुख तथा वन संरक्षक (प्रादेशिक)
छत्रपती संभाजीनगर

**प्रतिलीपी :-** अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य नागपुर यांना संदर्भिय पत्रान्वये माहीतीस्तव सादर.
**प्रतिलीपी :-** अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) महाराष्ट्र राज्य नागपुर यांना माहीतीस्तव सादर.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

# वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांचे कार्यालय

**'वनभवन' उस्मानपुरा, स्टेशन रोड, औरंगाबाद- ४३१ ००५**

**Website:www.mahaforest.gov.in**

दूरध्वनी : (०२४०) २३४५५०८ ई-मेल : ccftabad@mahaforest.gov.in

---

छत्रपती संभाजीनगर (प्रादेशिक) वनवृत्तासाठी कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार या पदाच्या पदभरतीसाठी नामिकासुची तयार करणे करीता जाहिरात सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ अन्वये औरंगाबाद वनवृत्तातील विधी विषयक कामासाठी एका विधी सल्लागाराची कंत्राटी पध्दतीने नेमणुक करावयाची आहे. त्यासाठी अर्हता अनुभव व ईतर पात्रता धारण करणारे इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी यांनी **दिनांक १७/०२/२०२६** (जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन) ते ०५/०३/२०२६ रोजी **सायंकाळी ५:००** वाजेपर्यंत वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात विहीत नमुन्यात अर्ज सादर करावेत.

| | |
|---|---|
| पद | विधी सल्लागार (हि शासकीय नौकरी नसुन, केवळ कंत्राटी पध्दतीवर ११ महिन्याच्या करारावर निवड करावयाची आहे.) |
| मासिक परिश्रमिक व भत्ते | १. मासिक परिश्रमिक :- नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम (अंशराशीकरण निवृत्तीवेतन वगळुन)<br>२. भत्ते : उक्त तरतुदी नुसार निश्चित होणा-या मासिक भत्त्यासह परिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्त्यापोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयी सुविधा इत्यादी बाबी विचारात घेवुन निश्चित करण्यात येईल.<br>३. प्रवास भत्ता व दैनिक भत्ता :- कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतन मानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. |
| पात्रता | शासकीय सेवेतील ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे / सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधिश, सेवा निवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश तसेच प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांची सेवा तसेच शासकीय सेवेतील (गट-अ ग्रेड रु.७६००/- पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिकारी. |
| सविस्तर तपशिल वनविभागाचे www.mahaforest.nic.in या वेबसाईटवर Aurangabad Circle Office/ News & Event या वेबपेजवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तरी, इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहुन अर्ज करावेत. | |

स्वाक्षरी/-
विभाग प्रमुख तथा
वन संरक्षक (प्रादेशिक)
छत्रपती संभाजीनगर

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

# वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय

'वनभवन' उस्मानपुरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००५

Website:www.mahaforest.gov.in

ई-मेल : ccftabad@mahaforest.gov.in

दूरध्वनी : (०२४०) २३४५५०८

---

छत्रपती संभाजीनगर (प्रादेशिक) वनवृत्तासाठी कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार या पदाच्या पदभरतीसाठी नामिकासुची तयार करणे बाबत वनसंरक्षक प्रादेशिक छत्रपती संभाजीनगर यांचे अधिनस्त ११ महिन्यांच्या करारावर खालील विषयाकरीता कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार हे पद भरणेकामी जाहिरात **दिनांक १७/०२/२०२६** रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन सदर पदासाठी शासकीय सेवेतील ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे/सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधिश, सेवा निवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश व प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांची सेवा तसेच (गट-अ ग्रेड रु.७६००/- पेक्षा कमी) संवर्गिय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिकारी यांना अर्ज करण्याची मुदत **दिनांक** ०५/०३/२०२६ रोजी **सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत** अशी राहील. तथापी गट-क व गट-ड संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी आवेदन पत्र दाखल करु नयेत.

| अ.क्र. | विषय | नामिका सुचीत समाविष्ठ करावयाची पदसंख्या |
|---|---|---|
| १ | वनवृत्तातील विधी विषयक कामकाज | विधी सल्लागार – ०१ |

**<u>अर्ज सादर करणेचा कालावधी :-</u> दिनांक ०५/०३/२०२६** रोजी **सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत** खालील पत्त्यावर लिखीत स्वरुपात सादर करणेचे आहेत. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाबाबत योग्य त्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित सत्यप्रती जोडाव्यात. मुळ प्रति जोडु नयेत. मुलाखतीस बोलाविल्यास त्यावेळी मुळ कागदपत्रे दाखवावी लागतील. पदसंख्येच्या १ : ३ प्रमाणात मुलाखतीस बोलाविले जाईल.

**<u>अर्ज सादर करणेचा पत्ता :-</u>** वन संरक्षक (प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय, वनभवन, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर.

**<u>वयोमर्यादा :-</u>** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ अन्वये कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार या पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ वर्षे वयापर्यंतच कार्यरत राहु शकतील. तथापी, यास एकस्तर वरीष्ठ अधिका-याच्या/प्राधिका-याच्या मान्यतेने पुढे चालु ठेवता येतील मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

**<u>करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा :-</u>** सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देता येईल. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकते नुसार वाढीव कालावधी करिता दरवर्षी नुतनीकरण करता येईल. मात्र एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

**<u>सक्षम अधिकारी :-</u>** शासकीय सेवेतील ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे/सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधिश, सेवा निवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश व प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांची सेवा तसेच (गट-अ ग्रेड रु.७६००/- पेक्षा कमी) संवर्गिय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम ९ (२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.

**अर्हता व अनुभव :-** १. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अहर्ता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवा निवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवा निवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**मासिक परिश्रमिक व भत्ते :-**

**१. मासिक परिश्रमिक :-** सेवानिवृत्त अधिका-यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या वेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळुन) त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल.

**२. भत्ते :-** उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या मासिक परिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्त्यापोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयी सुविधा इत्यादी बाबी विचारात घेवुन निश्चित करण्यात येईल.

**३. प्रवास भत्ता व दैनिक भत्ता :-** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

**अटी व शर्ती :-**

१. **बंधपत्र/हमीपत्र :-** निवड करण्यात येणा-या अधिका-यास/व्यक्तीस बंधपत्र/हमीपत्र सादर करावे लागेल. सदर बंधपत्रात शासनाने दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच विभागाने विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडुन नियमित सेवेत घेणेबाबत अथवा इतर कोणत्या हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

२. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार आहेत.

३. नियुक्त झालेल्या अधिकारी त्यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.

४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५. नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहीती व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६. नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.

७. वरील सर्व पदांसाठी संगणक ज्ञान आवश्यक राहील.

८. नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे कार्यकक्षेत काम करणे बंधनकारक राहील.

९. मराठी व इंग्रजी पत्रव्यवहार करता येणे आवश्यक राहील.

१०. सदर पद हे आवश्यकतेनुसार कमी करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी राखुन ठेवलेला आहे.

११. कंत्राटी सेवेतील अधिका-यांना सर्व प्रकराच्या शासकीय सुट्या लागु राहणार नाहीत. २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर या शिवाय साप्ताहीक सुट्टी व ११ महिन्यांकरीता पूर्व परवानगीने उपभोगावयाच्या ८ किरकोळ रजा लागु राहतील.

१२. अर्जदार गुन्हेगारी प्रवृत्तीचा किंवा पाश्र्वभुमीचा नसावा. तसे आढळुन आल्यास सदर अर्जदारास तात्काळ कमी करण्यात येईल.

१३. सदरचे पद हे महाराष्ट्र शासनाचे निर्मित पद नाही.सदर पदावर निवड केल्यास कोणतीही अनुभवाचा दाखला, पदावर हक्क अथवा निर्माण होणा-या शासकीय फेडरेशनच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.

१४. प्राप्त अर्जाची छाणनी करुन मुलाखतीसाठी पात्र अर्जदारास अलाहिदा तारीख, वेळ व ठिकाण कळविण्यात येईल.

१५. अधिका-यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमुद केल्यानुसार विवक्षित कामासाठी लागेल.

१६. मुलाखतीसाठी अर्जदारास स्वखर्चाने यावे लागेल. निवड प्रक्रियेत बदल करण्याचे अथवा ती रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवलेले आहेत.

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर
दिनांक :     / ०२/२०२६

स्वाक्षरी/-
विभाग प्रमुख तथा
वनसंरक्षक (प्रादेशिक)
छत्रपती संभाजीनगर

## विधी सल्लागार यांच्या जबाबदा-या खालीलप्रमाणे राहतील

१. संबंधित वन अधिका-याकडुन विधी विषयक सल्ला देण्या बाबत लेखी स्वरुपात संदर्भ प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.

२. वन विभागातर्फे दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय/शपथपत्राचे प्रारुप हे कायदेशिरदृष्ट्या बरोबर आहे किंवा कसे या बाबत संबंधित वन अधिका-याकडुन संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधित वन अधिका-यांनी तयार केलेल्या प्रारुपाची छाननी किंवा तपासणी करुन आवश्यकतेनानुसार सुधारणा करणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन प्रकरणांच्या अद्यावत स्थितीबाबत संबंधित वन अधिका-यांना वेळोवेळी लेखी अवगत करणे.

४. शासनाच्या विरोधात न्यायालयीन निकाल लागल्यास, अपील/किंवा पुर्नविलोकनाची प्रक्रिया वेळीच व्हावी याबाबत दक्षता घेणे.

५. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

६. विभागातील न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने वेळोवेळी होणा-या न्यायालयीन सुनावणीच्या वेळेस हजर राहुन त्यानुषंगाने विभागप्रमुखांनाअहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

७. करारनाम्याच्या कालावधीत विधी सल्लागार हा वन विभागाच्या विरोधातील कोणतेही प्रकरण हाताळणार नाही.

८. न्यायालयीन प्रकरणात संबंधित वन अधिकारी यांचे कडुन परीच्छेदनिहाय अभिप्राय प्राप्त झाल्यास त्यांना इंग्रजीमध्ये शपथपत्राचा मसुदा तयार करुन देणे.

प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शैक्षणित अर्हता, अनुभव, इत्यादी अहर्ता किमान अनुभव किमान अर्हता धारण केलेली आहे म्हणुन उमेदवार मुलाखतीस बोलावण्याकरीता पात्र असणार आहे असे नाही. जाहीरातीस अनुसरुन पात्र झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता अथवा अनुभव या पेक्षा ज्यादा शैक्षणिक अहर्ता आणि अनुभवांच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेव्दारे मुलसखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादीत करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास अर्हता आणि/अनुभव शिथील केल्या जाणार नाही.

# अर्जाचा नमुना

| |
|---|
| आयडेंटिटी<br>साईझ<br>रंगीत फोटो |

**प्रति,**

विभाग प्रमुख तथा
वनसंरक्षक (प्रादेशिक),
छत्रपती संभाजीनगर

**विषय:- करार पध्दतीने विधी सल्लागार या पदासाठी पदभरती करणे बाबत.**

**संदर्भ:-** दैनिक ------------ ची दिनांक -------------रोजीची जाहिरात

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात वाचली असुन, माझा व्ययक्तिक तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. संपुर्ण नांव :-

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

३. संपुर्ण पत्ता व भ्रमणध्वनी/ संपर्क क्रमांक/ ईमेल आय डी :-

४. शैक्षणिक पात्रता :-

५. अनुभव :- (विषय क्रमांक १ ते      पैकी) :- अनुभव विस्तृत नमुद करणे यावा.

६. वेतनाची किमान अपेक्षा :-

७. शासकीय सेवेत रुजु दिनांक :-

८. शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक :-

९. सेवानिवृत्तीच्या दिनांका वेळचे वेतन :-

अर्जासोबत माझ्या उपरोक्त माहीतीच्या अनुषंगाने शैक्षणिक पात्रता, जन्म तारीख, सेवा विषयक कागदपत्रे, अनुभव आणि शासन सेवेतील नियुक्ती पासुन सेवानिवृत्ती पर्यंतच्या कालावधीत विविध विभागात केलेल्या सेवेचा तपशीलाच्या मुळ प्रतीनुसार प्रमाणित केलेल्या छायामुद्राकिंत प्रती सोबत जोडलेल्या आहेत. माझी सर्व माहिती ही सत्य व अचुक आहे. तरी, माझी------------------------ सदर पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर

दिनांक :-      /०२/२०२६

# <u>जाहिरात</u>

## <u>महाराष्ट्र शासन वनविभाग</u>

**वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय**

**शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामाकरीता घेण्यासाठी जाहिरात (विधी सल्लागार-०१ पद)**

वनसंरक्षक,(प्रादेशिक),वनवृत्तांतर्गत सेवा करार पध्दतीने न्यायालयीन विवक्षित कामासाठी नेमणुक करावयाची आहे. तरी सेवानिवृत्त अधिकारी ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे, अशा इच्छुक सेवानिवृत्त अधि-यांकडुन विहित नमुन्यातील अर्ज वनसंरक्षक,(प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयास **दिनांक ०५/०३/२०26 रोजी सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी ज्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेतन चिठ्ठीत ग्रेड पे नमुद आहेत यांनीच अर्ज करावेत

या पदासाठीच्या आवश्यक अटी व शर्तींचा तपशील वनविभागाच्या <u>www.mahaforest.nic.in</u> या वेबसाइटवर Aurangabad Circle office/ News & event या वेबपेजवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

ठिकाण:- छत्रपती संभाजीनगर

दिनांक /०२/२०२६.

सही/-

(प्रमोद चंद लाकरा)

अध्यक्ष तथा वनसंरक्षक, (प्रादेशिक),

छत्रपती संभाजीनगर

## जाहिराती सोबत पाठविण्याच्या पत्राचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नांव पत्ता व दुरध्वनी क्रमांक | वनसंरक्षक (प्रदेशिक), कार्यालय वनभवन, उस्मानपुरा, रेल्वे स्टेशन रोड, एस.एस.सी. बोर्ड समोर, छत्रपती संभाजीनगर |
| २ | जाहिरातीचे स्वरुप (विभागीय किंवा जिल्हापातळी) | विभागीय पातळी |
| ३ | कोणत्या जिल्ह्याशी जाहिरातीचे काम संबंधित आहे | मराठवाड्यातील सर्व |
| ४ | जाहिरात प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख (किमान दहा दिवस अगोदर प्राप्त व्हावी) | **दिनांक:- १७/०२/२०२६** |
| ५ | किती वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे. (आकडा नमुद करावा – साप्ताहिक वगळुन) | एक (०१) (मराठवाडा प्रदेश) |
| ६ | (अ) कृपया वृत्तपत्राची नांवे नमुद करु नयेत अथवा सुचवु नयेत. जाहिरातीचे वितरण साखळी पध्दतीने होत असल्याने नांवे दिल्यास त्यात बदल करण्याचा अधिकार उपसंचालक (माहिती) यांना आहे.<br>(ब) शासकीस नियमानुसार एका साप्ताहिकाचा समावेश यात जरुर करावा. | |
| ७ | जाहिरात प्रसिध्दीची भाषा | मराठी |
| ८ | वरील जाहिरात किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे | एक वेळेस |
| ९ | ज्या अधिका-यांना अथवा कार्यालयांना जाहिरातीचे देयक अदा करण्यासाठी पाठवयाचे आहे त्या कार्यालयाचे नाव दुद्या व दुरध्वनी क्रमांक | वनसंरक्षक (प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर, कार्यालय वनभवन, दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३४५५०८<br>ईमेल आय डी ccftabad@mahaforest.gov.in |

स्वाक्षरी/-
विभाग प्रमुख तथा
वनसंरक्षक (प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर

**विशेष सुचना :-**

१. जाहिरात जितक्या वृत्तपत्रांत प्रसिध्दीसाठी द्यावयाची आहे त्यापेक्षा दोन ज्यादा जाहिरात मजकुराच्या प्रती जाहिराती सोबत पाठविण्यात याव्यात.
२. राज्यस्तरीय जाहिरात सहाय्यक संचालक (जाहिरात), माहिती व जन संपर्क महासंचनालय, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दुरध्वनी क्रमांक ०२२-२८५२४०४ यांचे कडे पाठविण्यात यावी.